**महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांचा आणि अंगणवाड्यांचा भौतिक विकास करून त्याचा शैक्षणिक उपयोग करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन (रोहयो) विभाग**
**शासन परिपत्रक क्र. मग्रारो-२०२०/प्र.क्र.७५/रोहयो-७**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ०१ डिसेंबर, २०२०

वाचा :-

१) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियम, २००५.

२) शासन निर्णय क्र मग्रारो- २०११/ प्र.क्र. २८/ रोहयो - १ दि. ३० जून २०११.

३) वार्षिक मास्टर सर्क्युलर २०२०-२१

४) शासन परिपत्रक क्र.मग्रारोहयो-२०२०/प्र.क्र.२१/रोहयो-७, दिनांक ०२/०९/२०२०

**प्रस्तावना:-**

आजचे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक आहेत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाल्यास देशाचे उज्ज्वल भविष्य आहेत. महाराष्ट्रातील बहुतांशी विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांतून शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये गोडी निर्माण व्हावी यासाठी शाळांचा परिसरही सुंदर असणे आवश्यक आहे. स्वच्छ, सुंदर आणि हिरवाईने नटलेल्या परिसरात शिकणे आणि शिकवणे या दोन्ही प्रक्रिया आनंददायी होईल. अशा परिसरात दिवसभर मन प्रसन्न राहील. अशाने मुले शाळेकडे पर्यायाने शिक्षणाकडे आकर्षित होतील. शाळांचा परिसर महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून सुंदर बनवणे शक्य आहे. जिल्हा परिषद शाळांचा भौतिक विकास करण्याच्या दृष्टीने महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत अनुज्ञेय असणारी काही कामे उपयुक्त ठरू शकतात.

याबाबतचे नियोजन अमरावती जिल्ह्यातील **चिखलदरा** तालुक्यातील **जैतादेही** गावच्या जिल्हा परिषद शाळेमध्ये गटविकास अधिकारी, चिखलदरा पंचायत समिती आणि जैतादेही शाळेच्या शिक्षकांनी केले आहेत. **'जैतादेही पॅटर्न' च्या** धर्तीवर मनरेगा योजनेच्या माध्यमातून राज्यातील इतरही शाळांचा भौतिक विकास करणे शक्य आहे. अमरावती जिल्ह्याने यात पुढाकार घेतला असून साधारण ४०% शाळांचे प्रस्ताव वरीष्ठ पातळीवर प्राप्त झाले आहेत. इतर जिल्ह्यांनी सुद्धा असीच कामगिरी बजवल्यास महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळांच्या भौतिक दर्जा आणि गुणवत्तेमध्ये नक्कीच वाढ होण्यास मदत होणार आहे. तसेच अशा सुंदर परिसरात शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांचा मानसिक विकास होण्यासही मदत होईल. परिणामी जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेण्याची मानसिकता पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये होण्यासाठी हातभार लागू शकेल.

याचप्रमाणे अंगणवाड्यांचा सुद्धा भौतिक विकास व सुशोभीकरण करणे शक्य आहे.

**शासन परिपत्रक :-**

**जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्यांच्या भौतिक विकासासाठी मग्रारोहयो अंतर्गत घेता येणारी कामे :-**

१) शाळेसाठी किचन शेड
२) शाळा/ अंगणवाडीच्या इमारतीसाठी रेन वॅाटर हारवेस्टींग संरचना
३) शाळा/ अंगणवाडीच्या परिसरात शोषखड्डा
४) शाळा/अंगणवाडीसाठी multi-unit शौचालय
५) शाळा/ अंगणवाडीसाठी खेळाचे मैदान
६) शाळा/ अंगणवाडीला संरक्षक भिंत (wall compound)
७) वृक्ष लागवड (बिहार पॅटर्न)
८) आवश्यकतेनुसार शाळा/ अंगणवाडीच्या परिसरात पेविंग ब्लॉक
९) शाळा/ अंगणवाडीच्या परिसरात/ बाहेर कांक्रिट नाली बांधकाम
१०) शाळा/ अंगणवाडीकडे येणारे रस्ते गुणवत्तापूर्ण करणे
११) बोअरवेल पुनर्भरण (शाळा/ अंगणवाडीत बोअरवेल असल्यास)
१२) गांडूळ खत प्रकल्प (यामध्ये तयार होणारे गांडूळ खत शाळा/ अंगणवाडीच्या परिसरातील झाडांसाठी वापरता येईल.)
१३) नाडेप कंपोस्ट

वरीलप्रमाणे आवश्यक कामे मनरेगा योजनेतून घेतली गेली तर राज्यातील जिल्हा परिषद शाळांचा तसेच अंगणवाडीचा भौतिक विकास होऊन परिसर सुंदर होण्यास मदत होईल.

१) शाळांच्या/ अंगणवाडीच्या परिसरात वृक्षलागवड केल्याने परिसर हिरवागार व प्रसन्न राहतो. तसेच फळांची झाडे लावली तर मुलांना खायला फळे उपलब्ध होतात. परिणामी त्यांचा पोषण स्तर सुधारण्यास मदत होते.

२) गांडूळ खत/ नाडेप कंपोस्ट केल्याने यामध्ये तयार होणारे सेंद्रिय खत शाळेच्या/ अंगणवाडीच्या परिसरातील झाडांना तसेच परसबागेला घालता येईल. त्यामुळे येणारी फळे/ पिके/ भाज्या या शुद्ध व रसायनिक खतमुक्त असतील. तसेच शालेय/ बालवयात विद्यार्थ्यांनाही सेंद्रिय शेतीची ओळख होईल.

३) **'मी समृद्ध तर गाव समृद्ध'** या संकल्पनेचा उद्देश प्रत्येक शेतकरी समृद्ध (लखपती) होणे हा आहे. त्यासाठी नवनवीन प्रयोग करून तसेच सेंद्रिय/ गांडूळ खतांचा वापर करून शेतातील माती (मृदा) तसेच पिकांची गुणवत्ता आणि दर्जा वाढण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याची आवश्यकता आहे. शाळेत/ अंगणवाडीत लहान वयातच मुलांना या गोष्टींची ओळख करून दिल्यास मुले घरी जाऊन त्यांच्या पालकांनाही सेंद्रिय/ गांडूळ शेतीचे महत्व समजावून सांगतील. पर्यायाने सेंद्रिय शेतीचा समाजामध्ये मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार होण्यास मदत होईल. तसेच हे विद्यार्थी मोठे झाल्यावर मोठ्या प्रमाणात सेंद्रिय शेतीचा वापर करतील. यात यश आल्यास सध्या रासायनिक खतावर खर्च होणारा देशाचा रू १,५०,००० कोटींहून अधिकचा परकीय

चलनाची बचत होईल. मातीची गुणवत्ता सुधारून पर्यावरणाला लाभ होईल तो वेगळाच. या सर्व ने लोकांचे शारीरिक आरोग्य सुधारण्यास सुद्धा मदत होईल.

४) शाळेच्या इमारतीला रेन वाटर हारवेस्टिंग संरचना करून त्यामाध्यमातून इमारतीच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी इमारतीच्या शेजारीच शोषखड्डा काढून त्यामध्ये सोडता येईल. पर्यायाने पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल. तसेच मुलांनाही पावसाचे पडणारे पानी अडवणे व ते तिथेच जिरवणे याचे प्रत्यक्ष ज्ञान मिळेल.

५) पोषण आहार शिजवण्यासाठी स्वतंत्र किचन शेड बांधल्यास बाहेरील contamination चा धोका टळतो.

६) शाळेच्या मुलांचे आरोग्य चांगले राहण्याच्या दृष्टीने शाळेत शौचालयही बांधता येते. त्यामुळे विद्यार्थामध्ये शौचालयाचावापर करण्याची प्रवृत्ती वाढीस लागेल. पर्यायाने हेच विद्यार्थी समाजात शौचालयाचा वापर करण्याबाबत जनजागृती करू शकतात. यामुळे आपले हागणदारीमुक्त समाजाचे स्वप्न साकार व्हायला हातभार लागेल.

७) खेळाच्या मैदानामुळे मुलांचा शारीरिक आणि मानसिक विकास चांगल्या पद्धतीने होऊ शकतो.

८) शाळेची संरक्षक भिंत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. तसेच शाळेच्या परिसरातील झाडांची जनावरांपासून सुरक्षा होऊ शकते.

९) शाळेच्या परिसरात चिखल होत असल्यास पेविंग ब्लॉक घेतले तर मुलांना परिपाठास बसण्यासाठी स्वछ जागा उपलब्ध होऊ शकते.

ही कामे मनरेगा योजनेतून घेतल्यास योजनेचे दोन उद्देश **१) अकुशल मजुरी रोजगार उपलब्ध करून देणे आणि २) गावात शाश्वत मालमत्ता तयार करणे** हे साध्य होतील. ही कामे करत असताना काही बाबी ध्यानात घेणे आवश्यक आहे.

१) अकुशल:कुशल हे प्रमाण ६०:४० असणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत कुशल (साहित्य) प्रमाण ४०% पेक्षा अधिक होणार नाही याची दक्षता घ्यावी. तथापि हे प्रमाण ग्रामपंचायत पातळीवर न राखता आल्यास जिल्हा पातळीवर राखणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे वरिष्ठांकडून शाळा/ अंगणवाडींना माहिती पुरविण्यात यावी व नियोजनात मदतही करावी.

२) अकुशल खर्च जितका जास्त असेल तितका कुशल खर्चास जास्त वाव मिळतो. त्यासाठी वृक्षलागवड, सीसीटी, डिप सीसीटी, WAT, एलबीएस, ढाळीचे बांध अशी जलसंधरणाची कामे मोठ्या प्रमाणात घ्यावी. या कामामध्ये जास्तीत जास्त भाग अकुशल (मजुरीचा) असल्याने मोठ्या प्रमाणात मनुष्यदिन निर्मिती होते व त्याप्रमाणात कुशल खर्चास जास्तीत जास्त वाव मिळतो.

३) जी कामे प्रस्तावित करावयाची आहेत त्या कामांचा समावेश पुढील वर्षीच्या (२०२१-२२) मनरेगा कृती आराखड्यात समावेश करावे. त्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांनी/ अंगणवाडीताईंनी आपल्या परिसरात उपलब्ध जागेनुसार आवश्यक कामांची यादी तयार करून ग्रामपंचायतला द्यावी. ग्रामसेवक/ रोजगार सेवक यांनी सदर कामांचा समावेश २०२१-२२ च्या मनरेगा कृती आराखड्यात करावा. सर्व कामे कृती आराखड्यात समाविष्ट झाल्याबाबत गटविकास अधिकाऱ्यांनी खात्री करावी. तथापि, असी कामे यावर्षाच्या आराखड्यात

सुद्धा पुरवणी बजेटचा भाग म्हणून घेता येतात. त्यासाठी गाव पातळीवर यावर्षीच्या २ सप्टेंबर च्या परिपत्रकात दिलेल्या मग्रारोहयोच्या मंजूरी प्रक्रियेचा (ग्रामसभेस बंदी असल्यामुळे) अवलंब करून पंचायत समितीच्या स्थायी समितीची मंजूरी घ्यावी.

४) शाळेच्या ई-क्लास/ समाजाने उपलब्ध करून दिलेल्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात फळबाग लागवड, बांबू लागवड, पाणलोट अशा प्रकारची कामे घेता येतील. यातून शाळांना दरवर्षी ठराविक उत्पन्न मिळायला लागेल. या मिळालेल्या उत्पन्नातून शाळा आपला विकास करू शकतात. त्यामुळे शाळा आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊन त्यांना भौतिक विकासासाठी भविष्यात कोणावरही अवलंबून राहण्याची आवश्यकता नसेल.

५) सर्व कामे मनरेगा योजनेच्या माध्यमातून होणार असल्याने शाळा/ अंगणवाडी/ ग्रामपंचायतला स्वतःजवळून पैसे खर्च करण्याची आवश्यकता नाही.

६) ज्या ग्रामपंचायतमध्ये अकुशल खर्च जास्त नसेल त्यामुळे त्यांना वरील कामापैकी कुशल खर्च जास्त असलेली कामे घेता येत नसतील तर त्यांनी अभिसरण शासन निर्णयात नमूद कामे अभिसरणमध्ये घ्यावीत. त्यासाठी त्यांना Part-C निधी निधी ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग, पेसा, आमदार/ खासदार निधी, जिल्हा नियोजन समितीचा निधी, जिल्हा वार्षिक निधी अशा योजनामधून वापरता येईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२०१२०११८०१५०१७१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

NAND KUMAR

Digitally signed by NAND KUMAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a362ebc5, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NAND KUMAR
Date: 2020.12.01 18:10:02 +05'30'

**( नंदकुमार )**

प्रधान सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

१) मा.मंत्री (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
२) मा.राज्यमंत्री (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
३) मा.प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
४) आयुक्त नरेगा, नागपूर
५) सर्व उपआयुक्त (रोहयो)
६) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक अधिकारी
७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक अधिकारी
८) सहसचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई
९) उपसचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सहाय्यक संचालक (लेखा), नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई
११) निवडनस्ती.